# पलासियो ग्रुपचे पंचतारांकित निवृत्ती आवास

**पणजी, दि. २७ (प्रतिनिधी):** पलासियो ग्रुप ऑफ कंपनीने भारताच्या सर्वप्रथम पंचतारांकित निवृत्ती आवासाची स्थापना गोव्याच्या शिरिदांव नदी किनारे केली आहे. त्यांच्या या प्रयत्नात त्यांना काही नामवंत आर्किटेक्ट व आर. सी. सी. सल्लागारांची मदत लाभली आहे. सेवानिवृत्त झालेल्या लोकांच्या इच्छा आकांक्षांना अनुसरून याची स्थापना केली आहे. या आवासाची सर्वात खास बाब म्हणजे पर्यावरणाची सुरक्षा लक्षात घेऊन ही घरे बांधण्यात आली आहेत. येथे रहिवाशांच्या सोयीसाठी केमिस्ट व रुग्णालयदेखील आहे. पलासियो ग्रुपने ही यशस्वी संकल्पना पुणे, लावासा व दक्षिण भारताच्या विविध भागांत पोहोचविली आहे. मुंबईतही पंचतारांकित निवृत्ती आवासाची स्थापना पलासियो ग्रुपने केली आहे.

LOKMAT
28th August 2009